# असे लिहिले होते लो. टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

पुनम सिंगवी



चित्रकार विजयराज बोधनकर

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

लेखक
प्रा. पुनम सिंगवी

(विनामूल्य ‘ई’ संदर्भ पुस्तक)

# अनुक्रमणिका

१. हे असेच अजून किती काळ चालायचे?
१८९३ च्या दंग्याचे लोकमान्य टिळकांचे विश्लेषण आणि १९९३ ची दंगल ........... ०५

२. 'कमिशनांचा हंगाम' ........ ११

३. 'शेतकऱ्यांची स्थिती कशी सुधारता येईल?' ........ १४

४. देशी भाषांची दैना (मार्च, डिसेंबर १८९४) ........ १७

५. भारताच्या आर्थिक समस्या – औद्योगिक पारतंत्र्य, इत्यादी
(१ फेब्रुवारी १८९२ ते ११ नोव्हेंबर १९०२) ........ २०

६. 'स्वराज्य आणि सुराज्य' (९ एप्रिल १९०७) ........ २४

७. खरे विद्यापीठ कोणते? (२५ फेब्रुवारी १८९६) ........ २७

८. यंदाचा गणपतीउत्सव (३ सप्टेंबर, १८९५) ........ ३०

# लेखकाचे मनोगत

साहित्य अकादमी, नवी दिल्ली तर्फे प्रकाशित करण्यात आलेले लोकमान्य टिळकांच्या लेखसंग्रहाचे सर्व खंड माझ्या वाचण्यात आले आणि मी अक्षरशः झपाटलो गेलो. १९९०च्या दशकात हे खंड वाचत असताना लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वीच्या भारतातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, औद्योगिक इत्यादी सर्वच क्षेत्रातील परिस्थिती आणि घटनांवर केलेले भाष्य १९९०च्या दशकातील तशीच परिस्थिती आणि घटनांना कसे तंतोतंत लागू पडते हे बघून मी दोन कारणांसाठी अचंबित झालो.

त्यातील एक म्हणजे लोकमान्य टिळकांचे विलक्षण तार्किक विश्लेषण, द्रष्टेपणा आणि चतुरस्त्र विद्वत्ता. सर्वसामान्य माणसासही समजण्यास सुलभ जावे असे हे त्या वेळच्या प्रचलित मराठीतील भाष्य होते.

आणि दुसरे म्हणजे लोकमान्य टिळकांनी त्या वेळी व्यक्त केलेले विचार आणि घटनांच्या विश्लेषणानंतर भारत स्वतंत्र होऊन पन्नास वर्षे होत आली तरीदेखील त्या परिस्थितीत तसूभरही फरक पडलेला दिसला नाही. तारखा आणि घटनांचे संदर्भ बदलून कोणा लेखक-संपदकाने तेच लेख तसेच्या तसे आपले म्हणून छापले असते तरी त्याच्या विद्वत्तेचे कौतुक झाले असते!

मला लोकमान्य टिळकांचे हे विचार संक्षिप्त स्वरूपात वाचकांपर्यंत पाहोचवावेसे वाटले. त्यामुळे त्या खंडांमधील आठ निवडक लेखांवर आधारित सुमारे १०० वर्षांपूर्वी लोकमान्य टिळकांनी लिहिले होते- अशी मालिका ठाण्यातील ‘सन्मित्र’ या दैनिकातून लिहिली. त्यातील लोकमान्य टिळकांचे विचार इथे जसेच्या तसेच उद्धृत असले, तरी या शंभर वर्षात मराठी भाषेचा चेहरा-मोहरा बदललेला असल्यामुळे आजच्या या ‘ई’ संग्रहात आवश्यक ते बदल केले आहेत.

१९९३ साली लिहिलेल्या माझ्या या लेखमालेला देखील आज वीस वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी लिहून १२० वर्षांहून अधिक काळ लोटलेल्या विविध क्षेत्रातील परिस्थितीत काही बदल झालेला आहे काय याचा विचार वाचकांनीच करायचा आहे.

भविष्यातील वाचकांनादेखील अजून काही काळानंतर असाच विचार करण्यास प्रवृत्त करावे म्हणून हा लेखसंग्रह ‘ई’ स्वरूपात प्रसिद्ध करण्याचा खटाटोप करत आहे. सर्व वाचकांसाठी हे साहित्य विनामूल्य उपलब्ध असणार आहे.

पुनम सिंगवी (लेखक)<br>
ठाणे शुक्रवार १ ऑगस्ट २०१४<br>
(लोकमान्य टिळक पुण्यतिथी)

# हे असेच अजून किती काळ चालायचे?

# १८९३ च्या दंग्याचे लोकमान्य टिळकांचे विश्लेषण आणि १९९३ ची दंगल

श्रीकृष्ण अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर सर्वच राजकारणी लोकांनी एकच गदारोळ उठवला! पाच वर्षांहून अधिक काळ चौकशीला घेऊन सात खंडांमध्ये प्रसिद्ध झालेला हा अहवाल वाचून, विचार करून मगच राजकारणातील जबाबदार लोक त्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करतील ही अपेक्षा होती. पण सध्या 'जबाबदार' आणि 'राजकारणी' या शब्दांना एकमेकाची जवळीक सहन होत नसल्याने ही अपेक्षा अनाठायी ठरली.

प्रस्तुत लेखाचा विषय श्रीकृष्ण अहवाल हा नसून ऑगस्ट १८९३ मध्ये मुंबईत असाच हिंदू-मुसलमान दंगा झाला होता, त्या वेळी लोकमान्य टिळकांनी 'केसरी'त लिहिलेल्या अग्रलेखातून त्याचे कसे विश्लेषण केले होते हे बघणे हा आहे. धर्मनिरपेक्षतेचा गोंडस बुरखा पांघरून फक्त एकाच धर्मीयांचे लांगूलचालन करीत राहण्याचे आजच्या काही राजकीय पक्षांचे धोरण आणि १०० वर्षांपूर्वी या देशावर राज्य करणाऱ्या इंग्रजांची 'फोडा आणि झोडा' नीती यांत फरक नाही, हे सदर लेख वाचून लक्षात यावे. त्याचबरोबर आमच्या मुस्लीम बांधवांच्या वागण्यातदेखील अजून कसा फरक पडलेला नाही, तेदेखील कळावे. मग प्रश्न पडतो की, हे असेच अजून किती दिवस चालायचे? मुंबईचा हा दंगा होण्यास सौराष्ट्रातील प्रभासपट्टण येथील दंग्याचे मुख्य कारण असावे. तेथील दंग्यात नुकसान झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी मुंबईत गुजराती बांधवांनी सभा भरवल्या होत्या. त्याचा राग येऊन मुस्लीम बांधवांनी मुंबईत दंगल आणि लुटालूट केली. त्यात ५०-६० लोक प्राणास मुकले आणि ३०० लोक जखमी झाले. त्याचे विश्लेषण वाचू या 'केसरी'च्याच शब्दांत -

**हिंदू-मुसलमानांचा दंगा (१५ ऑगस्ट, १८९३)**

'मुंबईच्या दंग्याची हकिगत दुसरीकडे दिली आहे ती वाचून व ऐकून मनात नाना तऱ्हेचे तर्क उत्पन्न होतात. मुंबई शहरात बाहेरगावाहून म्हणजे

पुणे, ठाणे वगैरे ठिकाणांहून सुमारे तीन-साडेतीन हजार लष्करी शिपाई मुंबईस गेला आहे. मुंबईच्या सरकारी आरमारातील लोक व रेल्वेमधील काही व्हॉलंटिअर लोकही मुंबई पोलिसास मदत करत आहेत. परंतु या चार हजार लोकांकडून अजून व्हावा तसा बंदोबस्त होत नाही. मुसलमान हिंदूंना आणि हिंदू मुसलमानांना साधेल तेथे आणि साधेल तसे लुटताहेत; दोन-तीनशे लोक जखमी झाले आहेत, दोन-तीनशे कैद गेले आहेत, पन्नास-साठ प्राणास मुकले आहेत आणि सर्व लहानसहान गल्ल्यांतून व घरोघर लोक भीतीने व काळजीने व्याकूळ झाले आहेत, ही स्थिती पाहून इंग्रज सरकारने केलेल्या प्रजेच्या रक्षणाबद्दलच्या तयारीचे कोणासही आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. मुंबई बेट म्हणजे फार मोठे आहे, असे नाही; तथापि व्यापाराचे व राज्याचे ते मुख्य ठिकाण असल्यामुळे तेथे बहुतेक सर्व जातींचे व धर्मांचे लोक वाळूच्या कणाप्रमाणे एकत्र आलेले दृष्टीस पडतात. युरोपियन, ख्रिस्ती, पारशी, मुसलमान, अरब, शिद्दी, वाटे, खोजे, वाणी, मारवाडी, घाटी, दक्षिणी, कोकणी वगैरे सर्व प्रकारचे लोक तेथे उद्योगाकरता जाऊनयेऊन नेहमी राहत असतात. या लोकांमध्ये व्यापाराखेरीज सर्वांना सामान्य व सर्वांच्या सारखी हिताची अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाही. हा व्यापाराकरता एकत्र झालेला निरनिराळ्या जातींचा समूह केव्हा फाटेल आणि केव्हा एकत्र होईल हे सांगणे मोठे दुर्घट आहे आणि हे लक्षात ठेवून मुंबईच्या संरक्षणाची योग्य तजवीज सरकारने ठेवावयास पाहिजे. नेपोलियन बोनापार्टचे असे म्हणणे असे की, वेळेवरच तोफेच्या गोळ्यांचा उपयोग केला असता तर फ्रेंच रेव्होल्युशन ताबडतोब बंद करता आली असती आणि हाच न्याय बहुतेक दंग्यांस थोड्याबहुत अंशाने लागू आहे. जुम्मा मशिदीतून 'दीन दीन' करीत रात्री जे लोक बाहेर पडले त्यांचा पहिल्यानेच जर पोलिसांनी नीट समाचार घेतला असता, तर ही दंग्यांची आग इतकी पसरली असती की नाही याची आम्हांस शंकाच आहे. मुंबईचे पोलीस बातमी मिळवण्यात मोठे कुशल असतील, पण दंग्याचे बीज मोडण्याइतकेही त्यांच्याजवळ लष्करी सामर्थ्य असू नये ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. मुंबई इलाख्यात एक शहरी दंगा झाला, तर त्यास येथून लष्करी लोकांची कुमक पाठवावी लागली. तेव्हा हाच दंगा जर दोन-चार ठिकाणी झाला असता, तर सरकारची काय तारांबळ उडून गेली

असती ह्याची सहज कल्पना येते. सरकार दंगा मोडण्यास इतके दुर्बल आहे, अशी बदमाश लोकांची समजूत होणे इष्ट नाही, म्हणून हल्लीच्या दंग्यापासून सरकारने बोध घेऊन आपल्या पोलिसांची व लष्कराच्या वाटणीची व्यवस्था सुधारावी, अशी आमची सूचना आहे. इंग्रजी राज्यात लोकांच्या मालमत्तेवर व जीवितावर अशा प्रकारचे हल्ले क्वचित होतात हे खरे आहे; पण जेव्हा ते होतात तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांची मोठी धांदल उडून जाते, अशी सामान्यजनांची समजूत होऊन कधीही निभाव लागणार नाही.

सरकारच्या तयारीविषयी हा विचार झाला. पण ज्या लोकांमध्ये हा दंगा सुरू झाला आहे त्यांच्यामधील परस्परसंबंधांचा विचार केला म्हणजे दुसरेही अनेक प्रश्न उत्पन्न होतात. मुंबईच्या दंग्याची जी हकिकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून हा दंगा अकस्मात उत्पन्न होण्यास प्रभासपट्टण येथील दंग्याचे मुख्य कारण असावे, असे उघड दिसते. हिंदू लोकांनी पट्टण येथील लोकांना मदत करण्यासाठी भरवलेल्या सभा या मुख्यत्वेकरून मुसलमान लोकांना चिडवण्यास कारणीभूत झाल्या, असे कित्येकांचे म्हणणे आहे. परंतु त्याचा अर्थ आम्हांस बरोबर समजत नाही. हिंदू लोकांनी मोठमोठ्या सभा भरवून मुसलमानांवर स्वारी करण्याचे अगर त्यांजवर कोणत्याही रितीने छापा घालण्याचे अगर हल्ला करण्याचे ठरवले नव्हते. दु:खितांस अगर निराश्रितांस मदत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि त्याच हेतूने मुंबईतील गुजराती मंडळींनी प्रभासपट्टण येथील लोकांना मदत करण्याकरता मोठमोठ्या सभा भरवल्या होत्या. त्या सभांपासून मुसलमान लोकांस जर त्वेष आला असला, तर त्याचा सर्व दोष मुसलमान लोकांकडेच आहे. सभा भरवण्यात हिंदूंची काही चूक नव्हती आणि जोपर्यंत त्यांचा सर्व व्यवहार कायदेशीर होता, तोपर्यंत केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल मुसलमानांस वाईट वाटण्याचे कारण नाही. मुसलमान लोकांनीही आपल्या जातभाईंना मदत करण्याकरता सभा भरवली होती आणि तेथेही बरीच वर्गणी गोळा झाली होती. अशा रितीने सभेस सभा झाल्यावर फिरून मुसलमान लोक जर हिंदूंवर हल्ला करू लागले, तर हा दोष सर्वस्वी मुसलमानांवर टाकणेच न्याय्य आहे. अशा रितीने जाणूनबुजून व विनाकारण मुसलमानांनी हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त व्हावे हे मोठेच आश्चर्य आहे आणि अद्यापही सरकारकडून जर याचा नीट बंदोबस्त होणार नसेल, तर

मुसलमान लोकांचा शिरजोरपणा उत्तरोत्तर वाढत जाऊन तो अखेरीस सर्वांसच असमाधानकारक होईल यात संशय नाही. मुंबईचे पोलीस कमिशनर व्हिन्सेंट साहेब यांच्या मते गोरक्षणाबद्दल हल्ली जी चळवळ सुरू आहे त्यामुळे हे दंगे झाले असावेत. परंतु ही सबबही अगदी निरर्थक व निष्प्रयोजक आहे. उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान यांमधील मुसलमानांची स्थिती अगदी भिन्न आहे आणि हिंदुस्थानात ज्या काही गोष्टी असल्या दंग्यास कारणीभूत होतात, त्या आमच्या इलाख्यात होण्याचा संभव नाही. गोरक्षणाची चळवळ सुरू झाल्यापासून मुसलमान लोकांस पोटभर खावयास न मिळाल्याचे कोठेही ऐकिवात नाही! त्यामुळे 'टाइम्स ऑफ इंडिया'सारख्या पत्रकर्त्याने गोरक्षणाचा व दंग्याचा संबंध जोडून देणे म्हणजे एक प्रकारे मुसलमान लोकांस अप्रत्यक्ष रितीने उत्तेजन देण्यासारखेच आहे. मुसलमान लोकांची सर्वत्र अशी समजूत आहे की, सरकार आपणास भिते आणि यामुळे केव्हाही दंगा झाला असता सरकार सहसा हिंदूंची बाजू घ्यावयाचे नाही. मुसलमान लोकांची अशी समजूत आहे, ही गोष्ट आमच्या मते निर्विवाद आहे. लॉर्ड लॅरीस यांनी परवा शेठ लखमीदास खिमजी यांची भेट घेण्याचे नाकारले. अशा प्रकारच्या दुसऱ्या उदाहरणावरून थोडीबहुत तरी ही समजूत दृढ होत जाते. सरकार अशा रितीने एका धर्माच्या लोकांस वचकते अगर त्यांचा फाजील सन्मान ठेवते, अशी कोणाचीही समजूत होणे प्रजेच्या स्वास्थ्यास अपायकारक आहे आणि विशेषकरून आम्हा महाराष्ट्रीयांस तर सरकारची ही समजूत अत्यंत घातक आहे. उत्तर हिंदुस्थानात कित्येक ठिकाणी मुसलमानांचे प्राबल्य असेल, परंतु आमच्या इलाख्यात तसा प्रकार आजपर्यंत कधीही नव्हता.

इंग्रजी राज्य होण्यापूर्वी महाराष्ट्राचा इतिहास पाहिला म्हणजे मराठे लोकांनी खुद्द दिल्लीच्या बादशहापासून गोरक्षणाची सनद मिळवून आणल्याचे इतिहासात नमूद आहे. मुसलमानांचे राज्य जारी असता जर गोरक्षणाची अशा तऱ्हेने आपापसात व्यवस्था लागली, तर आजच मुसलमानांनी आमच्या प्रांतात गोरक्षणानिमित्त हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त का व्हावे याचे कारण आम्हांस समजत नाही. हिंदू व मुसलमानांत अशा तऱ्हेचे वैमनस्य उत्पन्न होऊन त्यांनी एकमेकांत मारामारी करावी, हे कोणाही समंजस मनुष्यास इष्ट वाटणार नाही. पण हल्ली जो प्रकार होत आहे, तो समंजस

मनुष्याच्या सल्ल्याने अगर कानाडोळ्याने होतो, असे मानण्यास बिलकूल आधार नाही. मुसलमान लोक जर शेफारले असले, तर त्याचे मुख्य कारण सरकारची फूस हे होय.

...मुंबईचे हिंदू लोक जे चवताळे आहेत, ते मुसलमानांसारखे धमर्वेडेपणाने अगर अविचारीपणाने नव्हे, तर केवळ आत्मसंरक्षणार्थच होय. एक दिवसापर्यंत त्यांनी वाट पाहिली, पोलिसांच्या हातून त्यांचे संरक्षण होईचना, तेव्हा आपल्या संरक्षणाकरता दंगेखोरांचा प्रतिकार करणे त्यांना भाग पडले. हिंदू लोक प्रथमत: दंग्यास प्रवृत्त झाले नाहीत हे एकंदर हकिगतीवरून अगदी स्पष्ट दिसत आहे आणि सरकारची मदत योग्य वेळेस येऊन पोहोचली असती, तर प्राय: कोणीही मारामारी करण्यास धजला नसता. अद्यापही सरकार जर हिंदूंचे संरक्षण करण्याचे व मुसलमानांनी विनाकारण केलेल्या दंग्याबद्दल त्यांना शासन करण्याचे अभिवचन देईल, तर हिंदू मोठ्या खुशीने दंग्यातून परत फिरतील, अशी आमची समजूत आहे.

युरोपियन लोक हिंदू लोकांस नेहमी असे हिणवत असतात, की इंग्रजी राज्य आहे म्हणून हिंदू लोकांचे मुसलमानांपासून संरक्षण होत आहे. आज जर इंग्रज लोक हिंदुस्थानातून गेले, तर मुसलमान लोक हिंदू लोकांना खाऊन टाकतील! जणू काय मुसलमान लोकांपासून आमचे संरक्षण करण्याकरताच परमेश्वराने यांना पाठवले आहे! परंतु ही समजूत अगदी चुकीची आहे. इतकेच नव्हे तर असल्याच उद्‌गारांनी मुसलमान लोकांना विनाकारण उत्तेजन मिळत गेले आहे. इंग्रज लोक हिंदुस्थान सोडून गेले असता, आमचे काय होईल याची आम्हांस बिलकूल काळजी नाही. इंग्रजांनी हिंदुस्थानात पाऊल ठेवण्यापूर्वीच मुसलमानांची सत्ता मोडत चालली होती आणि इंग्लिशांनी हिंदुस्थानाचे राज्य कमावले ते मुसलमानांपासून नव्हे, तर मराठे व शीख लोकांपासून होय.'

वाचकहो, आहे ना गंमत! बरोबर १०० वर्षांनंतर १९९३ मध्ये पुन्हा हिंदू-मुसलमानांमध्ये दंगल झाली. दोन्ही वेळच्या परिस्थितीत खूपच साम्य! म्हणजे ह्या १०० वर्षांत (ज्यांपैकी ५० वर्षे स्वातंत्र्यानंतरची लोकनियुक्त सरकारच्या आधिपत्याखालील होत!) राज्यकर्ते, शासन आणि समाज हे घटक निदान या बाबतीत तरी फारसे बदलले आहेत, असे दिसत नाही.

इतिहास काय नुसता करमणुकीच्या वाचनासाठी असतो का? त्यापासून कोणीच, काहीच शिकायचे नसते का? अजून सुमारे अडीच वर्षांनंतर आपण आणखी एका नव्या शतकात प्रवेश करणार आहोत. या शतकात वेगळे काही घडणार आहे का? आम्ही घडवणार आहोत का?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

## ‘कमिशनांचा हंगाम’

‘लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकिर्दीची आता दीड–दोन वर्षेच शिल्लक आहेत आणि गेल्या तीन वर्षांतील लाटसाहेबांच्या कर्तबगारीकडे लक्ष दिले असता त्या अवधीत तरी प्रजाजनांचा म्हणण्यासारखा फायदा लाटसाहेबांच्या हातून होतो किंवा नाही ह्याविषयी शंकाच उत्पन्न होऊ लागल्या आहेत. लॉर्ड रिपनंतर आलेल्या गव्हर्नर जनरलांमध्ये लॉर्ड कर्झनप्रमाणे भाषणात प्रजाजनांच्या हिताविषयी अत्यंत कळकळ दाखवणारे लाटसाहेब कोणीच झाले नाहीत, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांचे कोणतेही भाषण घ्या, हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेत विशेष फेरफार करून प्रजाजनांच्या हृदयात आपले नाव चिरस्थायी करण्याच्या मोठ्या खटपटीत लाटसाहेब चूर झाले आहेत असा भास होतो.’ शब्दसृष्टीत विलक्षण अवडंबर माजवून वस्तुस्थितीविषयी भ्रम उत्पन्न करण्याची हातोटी लाटसाहेबांना चांगली साधली असल्यामुळे पूर्वीचा विपरीत अनुभव विसरून जाऊन त्यांच्या प्रत्येक भाषणाच्या वेळी आता मात्र लाटसाहेब आमचे खरोखर हित करणार, असे वाटल्यावाचून राहत नाही.

पण ह्या शाब्दिक मायेवर सतत पाच वर्षे लोकांची तहानभूक भागणे शक्य नाही, ही गोष्ट लॉर्ड कर्झनसाहेबांच्याही ध्यानात आली असावी, असे त्यांच्या बजेटवरील भाषणावरून दिसून येते. इंग्रजी साम्राज्याच्या संरक्षणाकरता व अभ्युदयाकरता गेल्या तीन वर्षांत लॉर्ड कर्झनसाहेबांनी काय केले आणि त्याची कोणती फळे दृष्टीस पडत आहेत, हे जसे त्यांना आपल्या भाषणात नमूद करता आले, त्याप्रमाणे अंत:स्थ राज्यव्यवस्थेच्या सुधारणेकरता कोणते फेरफार करण्यात आले हे त्यांना सांगता आले नाही. काहीतरी फेरफार करावयास पाहिजे आहेत. साम्राज्याच्या बंदोबस्ताकडे लक्ष पुरवत असता घरातील सुखासमाधानाकडे दुर्लक्ष करता कामा नये, हे तत्त्व लाटसाहेबांना पूर्णपणे मान्य आहे. पण त्याची अंमलबजावणी झालेली मात्र

दृष्टीस पडत नाही. अंत:स्थ व्यवस्थेच्या सुधारणेचा प्रश्न पुढे आला की, त्याविषयी कोरडा कळवळा दाखवून कोणत्या ना कोणत्यातरी कारणाने तो विल्हेस टाकण्याचाच प्रयत्न दृष्टीस पडतो. अशा रीतीने महत्त्वाचे प्रश्न विल्हेस टाकण्याची सर्वांत उत्कृष्ट युक्ती म्हणजे त्याची सांगोपांग चर्चा करण्याकरता कमिशन नेमणे होय!

कोणताही महत्त्वाचा प्रश्न लाटसाहेबांच्या पुढे जावो, त्याच्यावर कमिशन बसून तो हिंदुस्थानभर गरगर फिरावयास लागला म्हणून समजावे. आज हिंदुस्थानाचा असा कोणताही भाग रिकामा नाही की, त्यात कोणत्या ना कोणत्या तरी प्रश्नाच्या संबंधाने कमिशन बसलेले नाही. दुष्काळ, प्लेग कमिशनांची कामे पूर्णत्वास आलेली आहेत. युनिव्हर्सिटी कमिशन फिरत आहे. औद्योगिक शिक्षणासंबंधाने चौकशी चालू आहे. राजकुमारांच्या कॉलेजांतून शिक्षणपद्धती कोणती असावी याची चौकशी करण्याकरता कमिटी बसली आहे. औद्योगिक शाळांच्या संबंधीच्या प्रश्नांची विचारपूस करण्याकरता एक मंडळ स्थापले आहे. शेतकऱ्यांकरता पेढ्या, लष्करी चौकशी करण्याकरताही महत्त्वाचे कमिशन नेमल्याबद्दल लाटसाहेबांनी आपल्या भाषणात प्रसिद्ध केले आहे. वरील सर्व कमिशनांची चक्रे फिरू लागली आहेत आणि पुढील दीड-दोन वर्षांत आणखी बरीच कमिशने उद्‌भवणार यात संशय नाही.

ही इतकी कमिशने नेमण्यात महत्त्वाची प्रकरणे कशीतरी विल्हेस टाकण्याचा हेतू नाही ना, या शंकेचा उल्लेख लाटसाहेबांनीच आपल्या भाषणात केला आहे. कमिशन म्हणजे लोकांस चकवण्याचे एक सोंग आहे, अशी पुष्कळांची खात्री होत चालली आहे. कोणत्याही प्रश्नासंबंधाने लोकांची विशेष ओरड होत चालली म्हणजे ती काही काळापर्यंत बंद पाडण्याकरता कमिशने नेमण्यात येतात, हे अनुभवास आले आहे. चौकशी करण्यातच कमिशनांची पुष्कळ वर्षे जातात आणि कमिशनचा रिपोर्ट तयार होईतो तो प्रश्नच शिळा होऊन जातो. पुढे त्या कमिशनच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली म्हणजे सरकारच्या दृष्टीने पूर्वीची स्थिती इतकी काही बदललेली असते की, कमिशनच्या सूचना सरकारला टाकाऊ वाटतात. बदललेल्या स्थितीत नवीन कमिशन नेमणे योग्य होईल किंवा कसे याची वाटाघाट

करण्यातच आणखी बरीच वर्षे जातात. शेवटी मुळीच कमिशन बसले नसते तर बरे असे म्हणण्याची पाळी लोकांवर येते.

लाटसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे ही कमिशने म्हणजे फसवणूक नसून या सर्व कमिशनांचा हेतू एकच आहे आणि तो म्हणजे सत्यान्वेषण हा होय. समुद्राच्या वाळवंटावर चकाकणारा शिंपला ज्याप्रमाणे सर्वांच्या नजरेस सहज पडतो, त्याप्रमाणे जे सत्य आहे ते उघड दिसले पाहिजे. पण वाळू, चुना व शेवाळे यांच्याखाली दडपून गेलेल्या शिंपल्याप्रमाणेच सत्य हेही सभोवारच्या वेष्टनामुळे चटकन लक्षात येण्यासारखे नसते.

लॉर्ड कर्झनसाहेबांनी वरील कारणास्तव कमिशनांवर कमिशने नेमण्याच्या पद्धतीचा अंगीकार केलेला आहे. कमिशन नेमणे म्हणजे लहानसहान काम नव्हे, अशी जर लाटसाहेबांची खरोखर समजूत असेल तर ते आमचे दुर्दैव होय. लॉर्ड कर्झनसाहेबांसारख्या कर्त्या लाटसाहेबांच्या कारकिर्दीत प्रजाजनांच्या हिताच्या प्रश्नाच्या वेळी केवळ शब्दजालाचा एवढा पसारा पडावा हे भावी सुस्थितीचे चिन्ह नव्हे.

एक गोष्ट लॉर्ड कर्झनसाहेबांना नम्रपणे सुचवावीशी वाटते की, हिंदुस्थानातील त्यांच्या कारकिर्दीचे आयुष्य आता जवळजवळ दीड वर्षांहून अधिक नाही. लाटसाहेबांचे हेतू स्तुत्य आहेत. प्रजाजनांचे हित करावे अशी त्यांना कळकळ आहे आणि आपल्यामागे लोकांनी आपले नाव काढावे अशी त्यांची इच्छाही आहे. पण पाच वर्षांपैकी साडेतीन वर्षे जर प्रस्तावनेतच गेली, तर दीड वर्षांत असा कोणता फायदा लोकांना होणार आहे हे दिसतच आहे.... कमिशनांच्या रिपोर्टचा उपयोग पुस्तक लिहिताना आकडे गोळा करण्याच्या कामी होण्यापलीकडे विशेष होईल असे आम्हांस वाटत नाही.'

वाचक हो, बघितलेत कमिशनांची खेळी किती जुनी आहे ती! आमच्या दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या पन्नास वर्षांत ती तशीच पुढे चालू राहिली. त्यात रडीचेदेखील अनेक प्रकार येत गेले.

मात्र आता आणखी हे असेच अजून किती दिवस पुढे चालू राहणार आहे?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

## 'शेतकऱ्यांची स्थिती कशी सुधारता येईल?'

'..... शेतकरी लोक दंगा करण्यास प्रवृत्त होण्याचे मुख्य कारण दारिद्र्य होय. कुटुंब वाढले, दुसरा व्यापारधंदा नाहीसा झाला, जमिनीत कस नसल्यामुळे ती नीरस होत चालली आणि पाऊसही वेळच्या वेळी पडत नाहीसा झाला! अशा स्थितीत कोणत्याही राष्ट्रातील शेतकरी दारिद्र्यात आणि कर्जात बुडालेले असावयाचे, करिता शेतकरी ॲक्टने ही स्थिती सुधारली आहे काय?..... नुसत्या ॲक्टमुळे शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारण कधीही समूळ नाहीसे होणार नाही... अज्ञान, उधळेपणा किंवा दर पिढीत होत असलेली इस्टेटीची वाटणी यांमुळे जर शेतकरी लोक उत्तरोत्तर दरिद्री होत चालले, तर कायद्यात कितीही फेरफार केले तरी त्यांची स्थिती सुधारायची नाही. हे दुर्गुण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराने नाहीसे होतील तेव्हा होतील. परंतु प्राथमिक शिक्षण देणे किंवा न देणे हे ज्या अर्थी सरकारचे कर्तव्य आहे, त्या अर्थी आमच्या मते सरकाराला या बाबतीत केवळ निर्दोषी म्हणता येईल असे दिसत नाही.... खरे शेतीशिक्षण म्हटले म्हणजे प्रत्येक तालुक्यातील किंबहुना प्रत्येक खेड्यातील शेतकऱ्यांस अमुक एक पीक तू हल्ली करतोस त्यापेक्षा अमक्या पद्धतीने केल्यास तुला अधिक फायदा होईल, असे अनुभवाने सांगणारे आणि जरूर पडल्यास कृतीने सिद्ध करून दाखवणारे लोक शेतीखात्यात असले पाहिजेत. हे काम अर्थातच बड्या पगारांच्या दहा–पाच जागा काढल्याने व्हावयाचे नाही. शेतकीच्या नव्या कृती, लावणी, पेरणी किंवा कापणी यांसंबंधीचे नवे शोध, नवीन बियाणे, नवीन जिन्नस व ते तयार करण्याच्या रीती; आपल्याकडे हल्ली शेतकीचे जे जिन्नस तयार होतात, त्यांचे पीक वाढवण्याचे मार्ग वगैरे सर्व काही ज्या शाळेतून सप्रयोग व सशास्त्र शिकवले जाईल अशी इलाख्यात एक मोठी शाळा आणि सर्व इलाखाभर लहानलहान शाळा निघाल्या पाहिजेत. हल्ली शाळा खात्याकडून खेडोपाडी शेतकऱ्यांच्या मुलांस ओनामा शिकवण्याच्या शाळा

निघालेल्या आहेत व हल्लीच्या डायरेक्टर साहेबांच्या कारकिर्दीत किंडरगार्टन पद्धतीप्रमाणे त्यात गोट्यांची, रंगांची, ड्रॉइंगची किंवा इतर बालोद्यान पद्धतीच्या शिक्षणवस्तूंची भर पडत आहे..... पण आमच्या दृष्टीने पाहता देशास हा मोठा फायदा झाला आहे, असे आम्ही समजत नाही. व्यापारी लोकांत ज्याप्रमाणे पैशाचे दोन पैसे कसे करावे; ही विद्या मुख्य समजतात, त्याप्रमाणे शेतकरी लोकांत खंडीचे दोन खंडी पीक कसे येईल, ही विद्या प्रधान समजली जाते. या विद्येचे बीज या शाळांतून त्यांस मिळत नाही असे स्पष्ट म्हणावे लागते..... देशात लोकसंख्या वाढल्यामुळे जमिनीचे उत्पन्न जर पुरेनासे होईल, तर देशात उद्योगधंद्यांची वृद्धी करून अगर दाट वस्तीतील लोक कमी वस्ती असलेल्या प्रदेशांत नेऊन त्यांच्या पोटाची सोय लावून देणे हे शहाण्या व सुधारलेल्या सरकारच्या कामांपैकीच एक काम आहे. देशातील सर्व लोक उपजीविकेची साधने शोधून काढण्यास असमर्थ असतात. ती कामे देशातील पुढारी लोक अगर ज्ञाती आणि सरकार यांनीच केली पाहिजेत. इतर राष्ट्रांतून ज्याप्रमाणे हिमतीचे पुढारी लोक असतात, तसे पुढारी आमच्याकडे नाहीसे होत चालले आहेत.

..... हिंदुस्थानातील एकोणीस वीसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोस रीतीने जमिनीवर चालतो, पण त्या जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ह्याचा विचार केला म्हणजे अंगावर काटा उभा राहतो. घरांत अठरा विसे दारिद्र्य! कर्जाचा बोजा डोईवर इतका की, घरदार, गुरेढोरे गहाण पडली तरी साल अखेर कशी मजल पोचेल ह्याची पंचाईत! सरकारदस्त दरवर्षास तारखेच्या तारखेला भरला पाहिजे, नाहीतर जमिनीचा लिलाव होण्याची पाळी यावयाची. त्यात अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टे अलीकडे वरचेवर कृपादृष्टी करू लागल्यामुळे दोनचार वर्षांनी समस्वरूपी दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच!... पूर्वी अशा प्रसंगी सावकार लोक उदारपणे शेतकऱ्यास मदत करीत आणि अशा वेळी राजे लोकही सूट देत. पण शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनातसे झालेत कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळीच भरवसा नाही. सरकार तर बोलूनचालून व्यापारी, तेव्हा सुटीची गोष्टच नको..... यंदा सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ इतका आहे की सध्याच लोक दोन पैशाला गाई-बैल विकू लागले आहेत. ही स्थिती यायला सावकार

लोकांचा जुलूम कारणीभूत आहे अशी सरकारची पक्की समजूत झाली! तेव्हा सावकारांच्या त्रासापासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्याकरता सरकारने शेतकऱ्यांचा फायदा केला. पण त्यापासून काही एक उपयोग न होता ज्यांच्या हिताकरिता तो करण्यात आला त्यांचे हाल वाढतच चालले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारने पतपेढ्या काढल्या आणि स्वत:च सावकारी करण्यास सुरुवात केली. तरी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेच नाही, तर शेतकऱ्यांचे दारिद्र्य कमी करण्याकरता जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होतो अशी लोकांची ओरड आहे. तेव्हा एकंदर प्रकाराची चौकशी करण्याकरता सरकारने कमिशन नेमले! एखादी गोष्ट अगदी नेटास लागली म्हणजे चौकशी करण्याकरता कमिशन नेमून तूर्तातूर्त तरी लोकांची तोंडे बंद करणे हा एकोणिसाव्या शतकात सर्वसंमत झालेला, सुधारलेला उपाय आमच्या सरकारास चांगला अवगत आहेच..... शेतकऱ्यांच्या दैनावस्थेचे मुख्य कारण सावकारांचा जुलूम नसून सरकारचाच कडकपणा होय.....'

वाचकहो, स्वातंत्र्य मिळाले. पन्नासहून अधिक वर्षे शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचे वर्चस्व असलेल्या सरकारने राज्य केले. अगदी लोकमान्य टिळकांना अभिप्रेत होत्या तशा नसल्या तरी शेतकी शाळा आणि एकाहून अधिक शेतकी विद्यापीठे राज्यभर निघाली. पाटबंधारे झाले. बरीच जमीन ओलिताखाली आली. शेतकऱ्यांना नुसताच सारा नव्हे तर वेळोवेळी कर्जमाफीही होऊ लागली आहे. वेळोवेळी सब्सिडीज मिळत आहे. आता मोफत वीज देण्याचादेखील प्रस्ताव आहे. त्याचा बोजा इतर ग्राहकांवर पडणार आहे. एका खिशातील पैसे काढून दुसऱ्या खिशात ठेवण्याने काय पँट घातलेली व्यक्ती अधिक श्रीमंत होणार आहे? अजूनही दरवर्षी शेतकरी आंदोलन होतच आहे. म्हणजे आमचा सर्वसामान्य शेतकरी अजूनही दारिद्र्यातच आहे. काय आणि कुठे बरे चुकत आहे आपले?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

# देशी भाषांची दैना (मार्च, डिसेंबर १८९४)

'... देशी भाषांना उत्तेजन देण्याची अलीकडे जी आवश्यकता वाटू लागली आहे ती केवळ वाचनालयांची कपाटे देशी पुस्तकांनी भरून जावी किंवा महाराष्ट्र भाषावधूला जिव्हाग्री व पेनाग्री नाचवणाऱ्या ॲडिसन, बर्क डिमास्थेनिसांची आमच्या देशात रेलचेल उडून जावी एवढ्याकरताच नव्हे. देशी भाषांच्या दुर्दशेमुळे एकूण तरुण पिढीच्या शिक्षणाला भलतेच वळण लागले आहे. त्यामुळे मुलांच्या कोवळ्या मनावर दुष्ट परिणाम होत आहे. वस्तुत: दुसऱ्या पुष्कळ प्रश्नांच्या मुळाशी देशी भाषांचा प्रश्न आहे, असे आता पुष्कळसे वाटू लागले आहे. हल्लीच्या शिक्षणाने तरुण मंडळी नि:सत्त्व होत आहेत आणि तेणेकरून पुढारी म्हणवणाऱ्या मंडळींतील स्वाभिमान, कर्तृत्वशक्ती व उत्साह नाहीसा झाल्यासारखा झाला आहे; ही गोष्ट सर्वांस कबूल आहे. पण हे शिक्षणाचे ओझे असह्य होण्यास विषयांची दुर्बोधता किंवा बाहुल्य वस्तुत: कारण नसून, इंग्रजीसारख्या परकी भाषेत ते विषय शिकवण्याची पद्धतीच मुख्य कारण आहे.

देशी भाषांच्या प्रश्नाचा आमच्या सद्य:स्थितीशी किती निकट संबंध आहे याचा जो-जो अधिक विचार होईल, तो-तो त्या प्रश्नाचे वास्तविक महत्त्व दिसू लागेल. केवळ दाईच्या स्तनपानावर जशी बालकांची नीट जोपासना होत नाही, त्याचप्रमाणे परक्या भाषेतून दिलेल्या उष्ट्या व नि:सत्त्व शिक्षणाने मुलांची मने कधीही सुसंस्कृत व्हावयाची नाहीत, आणि ती तशी झाल्याशिवाय त्यांच्या हातून मोठेपणी कोणतीही कर्तबगारी घडावयाची नाही. अर्थात देशी भाषांचा प्रश्न एकंदर भावी संततीच्या हिताला मूलभूत आहे.

इंग्रजीचे ज्ञान ज्या कारणांमुळे आवश्यक अगर अपरिहार्य आहे, त्या कारणाने नाही तर अन्य कारणाने संस्कृतादी जुन्या भाषांचे ज्ञानही देशी भाषांच्या उत्कर्षास आवश्यक आहे, असे थोड्या विचारांती कळून येईल. गेल्या काही वर्षांत देशी भाषांतून जे चांगले ग्रंथ झाले आहेत, ते वाचले

असता संस्कृतादी जुन्या भाषांतील शब्दांचा त्यात किती भरणा असतो आणि नवेनवे विचार देशी भाषेत व्यक्त करण्यास या जुन्या भाषांची किती मदत होते हे कोणासही उघड दिसून येईल. कोणत्याही भाषेत चांगली ग्रंथरचना होण्यास (१) शब्दसामग्री, (२) विचारसंग्रह आणि (३) ग्रंथांची जरुरी या तिन्ही साधनांची अपेक्षा असते. पैकी पहिले साधन बहुतेक अंशी आमच्या देशातील जुन्या भाषांच्या अभ्यासानेच प्राप्त होणार आहे.

युनिव्हर्सिटी परीक्षांत देशी भाषांचा शिरकाव करणे, हे या व्यापक प्रश्नाचे एक अंग आहे.

ज्या हेतूसाठी मराठी भाषेचा युनिव्हर्सिटीत प्रवेश व्हावा असे लोकांचे म्हणणे आहे, तो हेतू सिद्धीस जाण्यास देशी भाषांतील जुन्या कवींचे ग्रंथ विद्यार्थ्यांकडून घोकवून घेण्यापेक्षा निरनिराळ्या शास्त्रीय विषयांचा अभ्यास व मनन देशी भाषांतून त्यांच्याकडून करवल्यास जास्त उपयोग होईल. उपयुक्त विषयांवर देशी भाषांतून आधुनिक विद्वानांकडून व्हावे तितके ग्रंथ होत नाहीत आणि युनिव्हर्सिटीकडून अशा प्रकारच्या ग्रंथरचनेस जितके उत्तेजन मिळावे तितके मिळत नाही, हे पुष्कळ अंशी खरे आहे. परंतु हा दोष काढून टाकण्यास युनिव्हर्सिटीखेरीज इतर संस्थांनी आणि लोकांनीही प्रयत्न केला पाहिजे हे आम्हांस दिसता कामा नये. कोणत्याही भाषेत ग्रंथसंग्रह होण्यास ग्रंथांची जरुरी अथवा खप हे एक अंग आहे. जो माल खपतो तो पिकतो असा सर्वसाधारण नियम आहे आणि तोच ग्रंथरचनेसही लागू पडतो. परंतु असे जरी आहे, तरी युनिव्हर्सिटीत निदान काही विषयांचे अध्ययन देशी भाषांतून झाल्याने त्या भाषांस थोडेबहुत तरी खास उत्तेजन मिळेल अशी आमची समजूत आहे. इंग्रजी भाषा आजमितीस जी इतकी सुधारली आहे त्याचे कारण शेक्सपिअर, मिल्टन होत असे जर कोणी म्हणेल तर ते अगदी चुकीचे आहे. इतिहास, शास्त्रे, कला इत्यादिकांचा अभ्यास आणि सर्व जगभर पसरलेला इंग्रजांचा व्यापार आणि राज्य, त्यांचे सर्व व्यवहार इंग्रजी भाषेतच होत असल्यामुळे त्या भाषेच्या अंगी सहजच प्रौढपणा व व्यापकता हे दोन गुण आले आहेत, आणि ते गुण तितक्याच अंशाने देशी भाषेत येण्यासाठी तसे व्यवहार देशी भाषेतून व्हावयास हवेत हे उघड आहे.

इंग्रजी व संस्कृत या भाषांच्या ज्ञानाची सत्ता कमी न करता एक-दोन विषय देशी भाषेतून शिकवण्याची जर कॉलेजमधून सोय करता आली, तर

सदर भाषांना उत्तेजन देण्याच्या कामी युनिव्हर्सिटीने आपले कर्तव्य केले असे होईल.'

वाचकहो, आज शंभर वर्षांनंतरही आम्ही या बाबतीत धरसोड धोरणच ठेवत आहोत, असे आपल्यास नाही वाटत? सार्वजनिक व्यासपीठांवरून देशी भाषांचा उदोउदो करायचा आणि आपल्या अपत्यांना मात्र इंग्लिश माध्यमाच्या शाळांतून शिकायला पाठवायचे असा दुटप्पीपणा आपण बघत असतोच ना? महाविद्यालयांतून काही विषय देशी भाषेतून शिकवायचे सोडाच, परंतु प्राथमिक शाळांमधूनही सर्वच विषय इंग्रजीतून शिकवण्याकडेच आमचा कल नाही का वाढलेला? इंग्लिशच्या अधिकाधिक वापरामुळे आमच्या देशाचे आणि भावी पिढ्यांचे कल्याण होणार आहे, अशीच जर आमच्या देशातील राज्यकर्ते, विद्वान आणि पत्रकार ह्यांची प्रामाणिक समजूत असली; तर मग आपण देशी भाषांचा आग्रह का आणि किती धरायचा? समाजात यावर प्रामाणिक विचारमंथन होऊन त्यावर तेवढीच प्रामाणिक कारवाई होणार आहे का? आणि कोणी करायचे ते काम? देईल कोणी उत्तर?

एक मात्र खरे, आजकाल दोन पिढ्यांमध्ये बोलताना अधिक मोकळेपणा आलेला दिसतो. मात्र विचारांमधील अंतर खूपच वाढलेले जाणवते. काय बरे याचे कारण?

– पुनम सिंगवी

संदर्भ: लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

## भारताच्या आर्थिक समस्या – औद्योगिक पारतंत्र्य, इत्यादी (१ फेब्रुवारी १८९२ ते ११ नोव्हेंबर १९०२)

'कोणत्याही देशाची सांपत्तिक स्थिती निवळ शेतीवरच अवलंबून असल्यास ती सदासर्वकाळ चांगली राहणे संभवनीय नसते. मानवी राजांच्याही शिरावर असणाऱ्या मेघराजाच्या लहरी स्वभावावरच ज्यांचे भाग्य अवलंबून असते, ते लोक नेहमी सुखीच नांदतील असा नियम नाही. तथापि या त्याच्या लहरी स्वभावाचे दुष्परिणाम टाळण्यास फक्त दोनच उपाय आहेत आणि हे दोन्ही सर्वस्वीच नसले, तरी पुष्कळ अंशी त्यात्या देशातील राजांच्याच हाती असते. यांपैकी पहिला, लोकांना आपल्या प्रयत्नानेच ज्यात सिद्धी मिळवता येईल अशा तऱ्हेच्या कलांची व उद्योगधंद्यांची अभिवृद्धी करणे हा आहे. दुसरा उपाय त्या मानाने कमी दर्जाचा, परंतु महत्त्वाचा आहे. तो म्हणजे राजाने आपला भाग कायमचा ठरवून टाकणे आणि तो देऊन टाकल्यानंतर शेतकऱ्याच्या कुटुंबाचे वर्षभर पोषण होऊन आवर्षणाच्या वर्षासाठी त्यास संग्रह करून ठेवण्यास सवड सापडेल इतका तो भाग स्वल्प राखणे हा होय. इंग्रजांचे सरकार येईपर्यंत या देशात जरी बऱ्याच राज्यक्रांती व उलाढाली झाल्या, तरी वर दिलेल्या दोन्ही तत्त्वांस कोणत्याही देशी अथवा विदेशी राज्यकर्त्याने झुगारून दिले नाही, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे....

मुसलमानी अंमल सुरू होण्यापूर्वी कित्येक शतके आमचा व्यापार व आमच्यामधील कलाकौशल्य यांनी परकीयांस मोहून टाकले होते. फार प्राचीन काळापासूनच या उद्योगधंद्यांचे महत्त्व इकडच्या लोकांच्या हृदयात इतके पक्के बिंबले होते की, वाल्मीकी ऋषींनी सीतेला क्षौभ वस्त्रे लेववून, तिच्या स्वयंवराचा प्रसंग घेऊन त्यांच्या वेळच्या निरनिराळ्या धंद्यांची

संक्षेपाने यादी दिली आहे. परंतु (महाभारत काळात) व्यासांना येथेच थांबणे बरे न वाटून व्यापारधंद्यांच्या महत्त्वासंबंधाने भीष्माकरवी धर्मराजास त्यांनी उपदेश करवला आहे. अशा काळातील कौशल्याची स्मारके म्हणून लेणी व स्तंभ अद्यापि कायम आहेत आणि आम्ही कलाकौशल्याचे कामी इतर देशांच्या मानाने किती पुढे होतो यांचे स्मरण देऊन ते आज उद्वेग उत्पन्न करीत आहेत....

...भारतात इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर लवकरच ही स्थिती पालटली. देशी उद्योगधंदे बुडत चालले. कलाकौशल्याचाही ऱ्हास होऊ लागला. इंग्रज सरकारने एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात राजदंड धारण करून भारतातील राजसत्तेबरोबरच उद्योगधंद्यांवरदेखील आपली छाप पाडण्यास सुरुवात केली....

...इंग्रजी अमलात लूट, पगार किंवा व्यापार यांच्या मिषाने जो द्रव्याचा ओघ हिंदुस्थानातून इंग्लंडाला गेला, त्यामुळेच यांत्रिक कल्पना अमलात आणण्यासाठी लागणारे द्रव्य त्यांना उपलब्ध झाले. त्यामुळेच इंग्लंड भरभराटीच्या शिखरावर पोहोचला आणि आम्ही दारिद्र्याच्या चिखलात अधिकाधिक गढत चाललो. थोडक्यात इंग्लंडची भरभराट आमच्या ऱ्हासास कारणीभूत झाली. ...राजसत्ता इंग्रजांच्याच हातात असल्यामुळे जेणेकरून संपत्तीचा हा ओघ अधिक वेगाने पश्चिमेकडे जात राहील अशी सर्व व्यवस्था करण्यात आली.

...हिंदुस्थानातून कच्च्या मालाच्या निर्यातीस आणि इंग्लंडमधून पक्क्या मालाच्या आयातीस जास्तीत जास्त उत्तेजन देत राहण्याचे धोरण ठरवण्यात आले. पक्का माल येथे होता होईतो तयार होऊ देऊ नये असे फर्मान निघाले. कोष्ट्यांनी कापड विणण्यापेक्षा कंपनीच्याच कारखान्यात काम करण्यास भाग पाडावे आणि ते काम करण्यास तयार नसल्यास त्यांना अधिकाऱ्यांनी शिक्षा द्याव्यात असे धोरण राबवण्यात आले. कोष्ट्यांना कामासाठी आगाऊ पैसे देण्यात येऊ लागले. ज्याज्या कोष्ट्यांना कंपनीचे पैसे आगाऊ मिळाले असतील, त्यांना करार केलेल्या मालाची भरपाई होईतो दुसरीकडे कोठेही कामावर जाण्याची, अथवा आपण तयार केलेला माल दुसऱ्यास विकण्याची मनाई होती. कोष्ट्याने माल देण्यास उशीर केला

असता त्यांच्या पैशांतून ३५ टक्के कापून घेण्याचाही कायदेशीर अधिकार रेसिडेंट अधिकाऱ्यास देण्यात आला होता.

रेशमी माल विलायतेत पाठवण्याची बंदी झाली आणि सुती मालावरही भयंकर जकात बसवण्यात आली. इकडे तयार झालेल्या मालावर भयंकर जकात बसविण्यात आली. परंतु इंग्लंडमध्ये तयार झालेला माल मात्र फक्त अडीच टक्के जकातीवर इकडे येत असे. विलायती मालाची प्रदर्शने करण्यात येऊ लागली. देशातल्या देशात पाठवल्या जाणाऱ्या देशी मालावर ५ टक्के जकात बसवण्यात आली आणि पुढे त्याच्या वस्तू बनवल्यास, त्यांच्यावर १५ पासून १७ टक्क्यांपावेतो जकात घेण्यात येत असे! ही जकात वसूल करण्यासाठी ठिकठिकाणी रस्त्यांवर व गावाबाहेर अशी नाकी बसवलेली होती आणि नाकेदार फार प्रामाणिक(!) असल्यामुळे त्यांना बक्षिशी देण्यातच व्यापाऱ्यांचा जीव दमून जाई. अशी देशातील अंत:स्थिती असल्यामुळे व्यापार बुडत चालला आणि त्याबरोबरच कलाकौशल्याचा ऱ्हास जोराने होत चालला. याचा परिणाम म्हणजे अर्थात विलायती माल चोहोंकडून फडकू लागला. आमचा तयार झालेला माल परदेशी जाईनासा झाला आणि विलायती माल मात्र अधिकाधिक इकडे येऊ लागला.

जर अशा तऱ्हेचे कायदे इंग्लंड देशास लागू केले असते, अथवा इतकी परतंत्र स्थिती, जर दहा-वीस वर्षेच इंग्लंड देशात राहिली असती, तर ते राष्ट्र केव्हाच रसातळास गेले असते असे मानणे तर्कशास्त्रास धरून होणार नाही.'

वाचकहो, पारतंत्र्याचे जोखड झुगारून देऊन आज आम्ही अर्धशतक पूर्ण केले आहे. या काळात देशात अनेक उद्योगधंदे निघाले. उद्योगांचे विकेंद्रीकरणही होत आहे. देशांतल्या देशात भांडवल उभे करणे बऱ्याच अंशी शक्य होत आहे. तरीदेखील आपण औद्योगिकदृष्ट्या स्वतंत्र झालो आहोत असं म्हणता येईल काय? येथील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आमच्या छोट्या उद्योजकांची अवस्था त्या वेळच्या कोष्ट्यांसारखी नाही का करून ठेवलेली? छोट्या-मोठ्या गोष्टी करतानाही तांत्रिक साहाय्यार्थ आम्ही परदेशी धाव नाही का घेत? ज्या गोष्टींसाठी, ज्या उद्योगांसाठी आम्ही ५० वर्षांपूर्वी तांत्रिक ज्ञान भारतात आणले होते, उदाहरणार्थ, मोटारी तयार करणे, याच

उद्योगासाठी आजही आम्ही परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून नाही का? का नाही आम्ही आमचे तंत्रज्ञान जगाबरोबर ठेवू शकलो? आजही आयात मालाची किंमत देशी मालापेक्षा स्वस्त ठेवून देशी उद्योगांना मारक असे वातावरण देशात नाही, असे म्हणता येईल?

आर्थिक प्रश्नांकडेदेखील राजकीय चष्म्यातूनच बघत राहायचा करंटेपणा आमचे राजकारणी किती दिवस करत राहणार? का नाही यावर स्वतंत्ररीत्या विचारमंथन होत?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

# 'स्वराज्य आणि सुराज्य' (९ एप्रिल १९०७)

'मनात उद्भवणारे विचार आणि मुखावाटे निघणारे उद्गार यांच्यामधील संबंध नित्य असो वा अनित्य असो, एवढी गोष्ट खरी आहे की, विचार अर्धवट किंवा अस्पष्ट असले म्हणजे त्या विचारांचे द्योतक जे शब्द तोंडातून निघतात तेही अस्पष्ट किंवा संदिग्ध असावयाचे; आणि उलट बाजूने असेही अनुमान करता येते की, ज्याच्या भाषणात किंवा शब्दांत गोंधळ आहे, त्यांच्या विचारांतही गोंधळ असावयाचाच. वाणी आणि अर्थ यांचा हा संबंध फार महत्त्वाचा आहे आणि पुष्कळ प्रसंगी शिकलेले लोकही आपल्या विचारांमधील असंबद्धता किंवा अस्पष्टता शब्दावडंबरात छपवून टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. आपणांस काय पाहिजे याच्याबद्दल निश्चयात्मक कल्पना मनात असली म्हणजे तोंडावाटे किंवा लेखणीवाटे निघणारे शब्दही तसेच निश्चयार्थक असतात. आज 'स्वराज्य' आणि 'सुराज्य' या शब्दांची स्पष्ट व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे.

स्वराज्य म्हणजे आपले राज्य, एवढ्या उत्तराने चौकस मनुष्याचे समाधान होणे शक्य नाही. आपले राज्य म्हणजे काय? आपले म्हणजे आपल्या ज्ञातीचे, आपल्यातील सरदारांचे, आपल्या देशात अगर धर्मात उत्पन्न झालेल्या राजाचे? ज्या वेळी प्रजा आणि राजा दोन्हीही एकाच धर्माचे, एकाच देशाचे, एकाच जातीचे आणि एकाच प्रकारचे हितसंबंध असणारे असून राजा हा प्रजेच्या हिताबद्दल नेहमी तत्पर व दक्ष असतो, त्या वेळी प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच आहे असे वाटणे अगदी स्वाभाविक आहे. 'रामराज्य' हे अशाच प्रकारचे स्वराज्य होते. पण राजे लोक अधिकारपदाने किंवा अन्य कारणांनी अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करू लागले किंवा जुलमी झाले म्हणजे स्वधर्मातील किंवा स्वदेशातील राजा असतानाही त्याचे राज्य लोकांस नकोसे होते. पेशवाईच्या अखेरची स्थिती अशा प्रकारची होती आणि म्हणूनच तेव्हा बाजीरावाचे राज्य जाऊन इंग्रजांचे राज्य झाले. याचे लोकांस फारसे वाईट वाटले नाही. स्वदेशी राजाचे

राज्य, या अर्थाने ते स्वराज्याचा त्या वेळी उपभोग घेत होते. पण त्यातील राज्यकारभार अव्यवस्थित असल्यामुळे ते राज्य सुखकारक नव्हते. 'स्वराज्य' ह्या शब्दाचा अर्थ दोन प्रकारे होऊ शकतो. एक 'सुव्यवस्थित राज्य' आणि दुसरा 'सुखकारक राज्य'. या दुसऱ्या अर्थाने पेशवाईचे अखेरीस स्वदेशी बाजीरावाचे राज्य 'स्वराज्य' नव्हते असे म्हणता येईल. याच्या उलट दुसरीही उदाहरणे आहेत. राजा स्वदेशी असून आपल्या धर्माचा आहे आणि त्याची राज्यव्यवस्थाही शिस्तवार आणि सुरळीतपणाची आहे. उदाहरणार्थ, रशियातील (त्या वेळची) राज्यपद्धती घेऊ. रशियाचे झार रशियन लोकांस धर्माने किंवा जातीने परके नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांच्या हाताखालील प्रजेची सांपत्तिक स्थिती सुधारून ती भरभराटीस यावी आणि देशात अधिकाधिक पैसा येऊन तो लोकांत कायमचा राहावा अशी त्यांची इच्छा आहे. तथापि झारसाहेब आपल्या प्रजेस जितके स्वातंत्र्य द्यावयास पाहिजे तितके देत नसल्यामुळे किंवा राज्यकारभारात त्यांची सल्लामसलत घेत नसल्यामुळे त्यांचे राज्य प्रजेस हितकारक वाटत नाही. एका अर्थाने असेही म्हणता येईल की रशियात 'स्वराज्य' म्हणजे स्वदेशी राजाचे राज्य आहे आणि ते शिस्तवारीच्या दृष्टीने पाहिले तर 'सुराज्य'ही आहे, पण लोकांस सुखकारक राज्य अशा अर्थाने पाहिले असता 'सुराज्य' नाही... ते स्वदेशी राज्य आहे आणि तेथील राज्यकारभारही सुरळीत चालतो. पण हे राज्य प्रजेच्या मतांप्रमाणे चालत नाही आणि स्वराज्य या शब्दाचा अर्थ 'स्व' म्हणजे प्रजा यांच्या मताप्रमाणे चालणारे राज्य असा केला तर रशियातील राज्य सुराज्य असले तरी स्वराज्य नाही असेच म्हणावे लागेल.

हिंदुस्थानातील नेटिव संस्थानचे राज्यही खरे स्वराज्य नाही असे म्हणावे लागेल. नुसता स्वदेशी राजा असला म्हणजे काही सर्व कार्यभाग होत नाही. कदाचित त्याची राज्यपद्धती शिस्तवार नसेल आणि यदाकदाचित शिस्तवार असली तरी लोकांस सुखकारक नसेल. कारण शिस्त आणि सुख ही दोन्ही नेहमी एकत्र राहतातच असे नाही. तुरुंगाची व्यवस्था पुष्कळ शिस्तवार असते. पण त्यामुळे तुरुंगातील कैद्यास ती कधीही सुखकारक वाटत नाही. प्रजेपैकी बहुतेक सर्वांना, निदान जाणत्या लोकांस तरी, स्वातंत्र्यसुखाचे अत्यंत महत्त्व वाटत असते आणि ज्या राज्यात या स्वातंत्र्यसुखाचा लोप होतो ते इतर दृष्टीने कितीही शिस्तवार असले तरी लोकांस सुखकारक होत नाही.

जगात शिक्षणाचा जितका जितका अधिकाधिक फैलाव होईल त्या मानाने केवळ स्वदेशी राजा आणि सुव्यवस्थित राज्यकारभार एवढ्याने लोकांची तृप्ती होणे अधिकाधिक दुर्धर होत जाईल. इतकेच नव्हे तर 'प्रजासत्ताक राज्याखेरीज खरे स्वराज्य नाही' असे म्हणण्यापर्यंतही लोकांची मजल येऊन ठेपेल आणि याखेरीज दुसरे राज्य सुराज्य होणे नाही असेही लोकांस वाटू लागेल. स्वराज्य आणि सुराज्य यांची ही अंतिम एकवाक्यता होय. राजा स्वदेशस्थ किंवा परदेशस्थ या प्रश्नापेक्षा प्रजेच्या हातात सत्ता किती, हा प्रश्न हल्ली अधिक महत्त्वाचा होऊन बसला आहे. 'स्व' म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा आणि त्यांचे म्हणजे त्यांच्या सल्ल्याने चालणारे जे राज्य ते स्वराज्य. असले राज्य प्राय: व्यवस्थित आणि शिस्तवार किंवा एका दृष्टीने सुराज्य असावयाचेच. पण शिस्त थोडी कमी असली म्हणून तिची किंमत काही स्वातंत्र्यापेक्षा अधिक धरता येत नाही. सुराज्याने स्वराज्याची वाण भरून येत नाही असे जे म्हणतात त्याचा अर्थ हाच होय. सर्वांत मुख्य गोष्ट आपल्या मताप्रमाणे जे आपल्यास आपले हित वाटते त्या धोरणाने राज्यव्यवस्था चालवण्याचा आपणा सर्वांस अधिकार असावा ही होय, खरे स्वराज्य हेच होय.'

वाचकहो, स्वातंत्र्यानंतरची गेली पन्नास वर्षे आपण आपल्या निर्वाचित प्रतिनिधींमार्फत आपले राज्य चालवत आलो आहोत. पण त्यामुळे लोकमान्यांच्या व्याख्येतील 'स्वराज्य' आणि 'सुराज्य'चा अनुभव लोकांना येत आहे का? याच काळात अनुशासन पर्वाचादेखील प्रयोग झाला. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदारीप्रमाणे वागत असतात का? लोकसभा आणि विधानसभांचे कामकाज पाहत असताना अधिकांश लोकप्रतिनिधी आपल्यावरील ही जबाबदारी पार पाडताना दिसतात का?

जर तसे नसेल, तर 'स्वराज्य' आणि 'सुराज्य' या संदर्भात आजच्या प्रचलित राज्यपद्धतीचा पुनर्विचार करण्याची वेळ आलेली आहे का?

मला वाटते, याचा विचार करण्यासाठी, आपण लोकमान्य टिळकांच्याच तर्कसंगत विचारसरणीचा अधिकाधिक अवलंब करण्यास शिकायला हवे, नाही का?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

# असे लिहिले होते लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी

## खरे विद्यापीठ कोणते? (२५ फेब्रुवारी १८९६)

‘हिंदुस्थान हा देश प्राचीन काळी जेव्हा विद्या व कला यांविषयी प्रसिद्ध होता, तेव्हा या देशात विद्वानांचे मोठमोठे मठ असून तेथे रात्रंदिवस अनेक शास्त्रांचा व विद्यांचा अभ्यास नेहमी सुरू असे. बहुतेक क्षेत्रांच्या ठिकाणी विद्वानांचा मोठा समुदाय असून त्यांचा सर्व काळ अध्ययन, अध्यापन व ग्रंथरचना यांत जाई. या गृहस्थांच्या तालमीत दुसरे पुष्कळ विद्वान तयार होऊन देशभर जात. इतर ठिकाणी कोणी कोणत्याही शास्त्राचा अभ्यास केला असल्यास त्याला आपल्या विद्वत्तेची व गुणांची परीक्षा घेण्यास या नामांकित क्षेत्रांतून जावे लागत असे. बुद्धकालातही नालंदाप्रमाणे मोठमोठी विद्यामंदिरे बांधली होती आणि तेथे शेकडो विद्यार्थी आपला विद्याभ्यास पुरा करून देशभर जात असत. शास्त्राचा सतत अभ्यास व मनन करणारे पुष्कळ विद्वान ज्या ठिकाणी राहतात आणि त्यांची कीर्ती ऐकून दूरदूरचे शेकडो विद्यार्थी विद्यार्जनाकरता जेव्हा त्यांच्यापाशी येतात, तेव्हा एखाद्या स्थलास विद्यापीठ, विद्यामंदिर अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते. हल्ली सुधारलेल्या राष्ट्रांतूनही हाच प्रकार आढळून येतो. जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स अथवा अमेरिका या देशांत ज्या युनिव्हर्सिट्या आहेत त्या वर सांगितल्याप्रमाणेच विद्येची माहेरघरे आहेत असे म्हटले तरी चालेल. लोकांनी तयार केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन आपले काम भागले असे सुधारलेल्या राष्ट्रांतील युनिव्हर्सिट्यांस वाटत नाही. शास्त्राचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जावा आणि प्रत्येक शास्त्रात काहीना काहीतरी नवीन शोध व्हावा, या हेतूने त्या स्थापन झालेल्या असतात. तो हेतू तडीस नेण्याकरता चांगल्या रीतीने निर्वाह चालेल असे वेतन देऊन बरेच विद्वान गृहस्थ या युनिव्हर्सिट्यांतून त्यांची योग्यता पाहून केवळ विद्यावृद्धी करण्याच्या इराद्याने ठेवलेले असतात. अशा प्रकारची विश्वविद्यालये असली म्हणजे शास्त्रांस उत्तेजन येऊन विद्येची अभिवृद्धी होत असते...!

गेल्या पन्नास वर्षांच्या अनुभवावरून असे दिसून येत आहे की, दुधाने ज्याप्रमाणे ताकाचे अनुकरण करावयाचे त्याप्रमाणे युरोपियन विद्यापीठाचे आमच्या देशातील युनिव्हर्सिट्या हे अनुकरण होय. आमची पूर्वीची विद्यामंदिरे किंवा गुरूंचे आश्रम यांचा ऱ्हास होऊन ते आता नामशेष झाले आहेत. त्यांच्याऐवजी ज्या संस्था अस्तित्वात आल्या आहेत त्या जशा असाव्यात तशा नसल्यामुळे कोणत्याही शास्त्राचा अथवा विद्येचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ आमच्या देशात अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धी अथवा योग्यता आमच्या अंगात नाही असे नाही. ज्या देशात पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकाली होऊन गेले, त्यात सध्याचे काळी पाशचूर, एडिसन, स्पेन्सर मिल्ल वगैरे गृहस्थांप्रमाणे विद्वान का निपजू नयेत याचे खरे कारण शोधून काढून याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक विद्यावृद्धी इच्छिणारांचे कर्तव्य आहे.

हल्ली विश्वविद्यालयात जी व्यवस्था आहे आणि ज्या पद्धतीने त्यांचे काम चालत आहे, त्यामुळे पाशचूरसारखे विद्वान येथे निघत नाहीत. कोणत्याही सुधारलेल्या देशात युनिव्हर्सिट्यांची व्यवस्था ही शाळा व कॉलेजे यांतील गुरु–उपगुरूंकडे असते. ती आणि तशी असणे अगदी स्वाभाविक आहे. जे आपले आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत घालवतात त्यांसच विद्यार्थ्यांचे खरे गुणदोष अथवा अडचणी समजून येणे शक्य असते. युरोपातील प्रसिद्ध युनिव्हर्सिटीतून तेथील व्यवस्थेचे काम हे अशा प्रकारच्या विद्वानांकडेच असते. परंतु आमच्याकडील प्रकार त्याहून अगदी भिन्न आहे.

... मुंबई युनिव्हर्सिटी १८५७ साली स्थापन झाली. पण तेव्हापासून आत्तापर्यंत सुमारे एकशे चाळीस वर्षांत या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हे आश्चर्य नव्हे काय? आमच्या युनिव्हर्सिटीत आधी खरे विद्याव्यासंगी गुरू व उपगुरू नाहीत. त्यातूनही सदर युनिव्हर्सिटीची व्यवस्था अगदी तिऱ्हाइताच्या म्हणजे कॉलेजातील उपगुरूंच्याखेरीज इतर धंद्यांच्या ग्रहस्थितीचे हातात आहे. परीक्षा घेऊन बी.ए., एम.ए.चे शिक्के ठोकण्यापलीकडे युनिव्हर्सिटीत दुसरे काही काम चालत नाही. चॅन्सलरपासून सिंडिकेटपर्यंत जो–तो आपल्या धंद्यात गुंतलेला असल्यामुळे युनिव्हर्सिटीस विद्यामंदिर म्हणण्यापेक्षा परीक्षा घेण्याकरता रजिस्टर्ड झालेली कंपनी म्हटले तरी चालेल...!'

वाचकहो, शंभराहून अधिक वर्षांपूर्वी लोकमान्यांनी आपली ही खंत अत्यंत पोटतिडकेने व्यक्त केली होती. त्यांची अशी प्रामाणिक धारणा होती की, या अवस्थेस आपले त्या वेळचे पारतंत्र्य कारणीभूत आहे. विविध क्षेत्रांतील आमच्या सामाजिक अधोगतीचे आणि मागासलेपणाचे कारण त्यांना आपल्या परतंत्र असण्यात दिसत असे. म्हणून त्यांनी आपले सारे आयुष्य स्वातंत्र्य मिळवण्याच्या कामी खर्ची घातले.

स्वातंत्र्य मिळवण्याचे त्यांचे स्वप्न पुरे होऊन आज पन्नासहून अधिक वर्षांचा काळ लोटला आहे. मात्र त्यांची त्या वेळची खंत आजही अधिक तीव्र स्वरूपात आमचीदेखील खंत बनून राहिली आहे. विद्यापीठाच्या जोडीला आज नवीन 'क्लाससंस्कृती'देखील आली आहे. परंतु 'भारतीय गुरुकुल संस्कृती' अथवा 'पाश्चात्त्य विद्यापीठ संस्कृती'ची जागा ही 'क्लाससंस्कृती' घेऊ शकेल का? लोकमान्य टिळकांच्या आत्म्याचा नव्हे परंतु आपल्या भावी पिढ्यांचा तरी आपण विचार करणार आहोत की नाही?

काय बरे करता येईल? एक मात्र खरे की सर्वांत प्रथम आमचे विचार आणि आचरण यांच्यात आधी प्रत्येकाने व्यक्तिगत पातळीपासून सांगड घालायला हवी. नाही का?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# यंदाचा गणपतीउत्सव (३ सप्टेंबर, १८९५)

‘कोणत्याही लोकांमध्ये ऐक्याची वृद्धी होण्यासाठी जी अनेक साधने असतात त्यांपैकीच एक उपास्य दैवत असणे हे एक कारण आहे. राणीसरकारच्या राज्यछत्राखाली हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील लोक एकवटले जाऊन त्यांस एकराष्ट्रीयत्व येत आहे. याचा जर आम्हांस प्रत्यक्ष अनुभव आहे, तर एका प्रांतातच का होईना, पण वर्षातून दहा दिवस तरी एकाच देवतेच्या भजनपूजनांत लोक निमग्न झाल्याने त्यांच्यात ऐक्याची वृद्धी होणार नाही असे कोण म्हणेल? एक धर्म, एक राजा, एक भाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान अंगे आहेत. पैकी इंग्रज सरकारच्या राजसत्तेखाली शेवटची दोन साधने आपणांस चांगल्या तऱ्हेने प्राप्त झाली आहेत. राजकीय उपास्य दैवत एक असल्यामुळे जितका फायदा व्हावयाचा तितका हल्ली होत आहे आणि आमच्या मते धार्मिक उपास्य दैवत एक असल्याने तोच फायदा दुप्पट होण्याचा संभव आहे. हिंदू धर्मात सण कमी आहेत असे नाही. पण त्यांपैकी एक-दोन सणांखेरीज बाकी सण प्रत्येकाने आपापल्या घरी करण्याचे आहेत. त्यामुळे त्यांपासून जितका सार्वजनिक फायदा व्हावयाचा तितका होत नाही.

पंढरीच्या विठोबाच्या उत्सवासारखा एखाददुसरा उत्सव सर्व लोकांस प्रिय होण्यासारखा आहे. पण हे उत्सव अथवा यात्रा पुरातन असल्याने त्यांचे स्वरूप आपणांस पाहिजे तशा रीतीने करणे अशक्य नसले तरी बहुतेक असाध्यच आहे असे म्हटले तरी चालेल. त्यातून जो सार्वजनिक उत्सव असावयाचा तो ठिकठिकाणच्या लोकांना आपापल्या गावी करता येण्यासारखा पाहिजे. तसा विठोबाच्या यात्रेचा प्रकार नाही. ही उणीव गणपतीच्या उत्सवाने नाहीशी होईल अशी आमची समजूत आहे.

वर्षातून दहा दिवसच का होईना पण एका प्रांतातील सर्व हिंदू लोकांनी एका देवतेच्या उपासनेत गढून गेलेले असावे, ही काही

लहानसहान गोष्ट नव्हे. ही जर साध्य झाली तर आपल्या भावी अभ्युदयाचा आपण पाया घातल्यासारखे होईल. ख्रिस्ती व मुसलमानी धर्मात सार्वजनिक प्रार्थनेची जी पद्धत आहे त्यापासून त्या धर्मातील लोकांना जो फायदा होतो तशाच प्रकारचा फायदा दहा दिवसांचा गणपतिउत्सव सार्वजनिक झाल्याने हिंदू लोकांना होईल, अशी आमची खातरी आहे म्हणून या सर्व लोकांनी उत्सवाचे इतर ठिकाणीही जास्तीत जास्त अनुकरण करावे अशी आमची त्यांना आग्रहपूर्वक सूचना आहे. यंदा मुंबई, कोल्हापूर, सातारा, नगर, धुळे वगैरे ठिकाणी थोड्याबहुत अंशाने हा उत्सव झाला होता; पण यापेक्षा असले उत्सव सर्व ठिकाणी सुरू झाल्याखेरीज त्यांचा खरा फायदा आपणांस व्हावयाचा नाही. उपासनेपासून चित्तशुद्धी होते असे आपल्या जुन्या ग्रंथकारांचे जे म्हणणे आहे ते अगदी यथार्थ आहे. कोणत्याही देवतेची सर्वांनी एकनिष्ठपणे आराधना करणे यानेच उपासकांच्या मनाला एक प्रकारे वळण लागून त्यांच्यामध्ये उपासक बंधुत्वाची बुद्धी जागृत होते. मन व बुद्धी अशा रीतीने संस्कृत झाल्यावर त्यांचा उपयोग तशाच रीतीने अन्य ठिकाणी ठेवण्यासाठी अडचण पडत नाही. स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यांस अभिमान वाटत नाही, त्यांस स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून वाटणार? विषय निराळे असले तरी ते ग्रहण करण्यास मनाची आणि बुद्धीची स्थिती एकाच प्रकारची असावी लागते हे उघड आहे. एका प्रसंगी जर ती त्या प्रकारची झाली, तर दुसऱ्या प्रसंगीही ती तशी होण्यास विशेष अडचण पडत नाही. धर्मोन्नतीचा व धर्माभिमानाचा जर राष्ट्रीय अभ्युन्नतीशी काही संबंध असला तर तो याच प्रकारचा होय. करिता ज्याला आपल्या समाजाचे आणि लोकांचे हितकर्तव्य आहे, त्याने असल्या उत्सवांस मदत केली पाहिजे.'

वाचकहो, १९ व्या शतकात लोकमान्य टिळकांनी लिहिलेल्या केसरीतील या अग्रलेखानंतर २० वे शतक उलटून लवकरच आपण २१ व्या शतकातही प्रवेश करणार आहोत. लोकमान्यांचा अपेक्षित असल्याप्रमाणे हा गणपतिउत्सव महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतील छोट्यामोठ्या गावांमधील गल्ल्याबोळींतूनही पसरला. १९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळण्याच्या कामी गणपतिउत्सव आणि शिवजयंतीउत्सव यांसारख्या उत्सवांतून लोकांनी एकत्र येऊन केलेल्या विचाराभिसाराने महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

पण त्यानंतरच्या स्वातंत्र्यातील पन्नास वर्षांत विचारांचे हे अभिसरण असेच चालू राहिले आहे का? आणि हे उत्सव साजरे करताना टिळकांना अभिप्रेत असलेले सामाजिक ऐक्य आणि राजकीय सामंजस्य आम्ही साधत आहोत का? नसल्यास आपण थोडे अंतर्मुख होण्याची वेळ आज आली आहे असे नाही आपणांस वाटत?

– पुनम सिंगवी

संदर्भ : लोकमान्य टिळक लेखसंग्रह,
साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

* * *

# पुनम सिंगवी यांनी लिहिलेली अन्य पुस्तके

ग्यानबाची भटकंती

ग्यानबाचे पर्यावरण

आमची जागतिक मुसाफिरी (सहलेखक प्राचार्य अच्युत ओक)

आहे माझे ठाणे सुंदर, तरीही...! (फक्त इंटरनेट आवृत्ती)

माझे अध्यात्म : महाराष्ट्र टाइम्समधील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)

केंद्रीय अर्थसंकल्पावरील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)

कायद्याच्या माध्यमातून पर्यावरणरक्षण :
सन्मित्रमधील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)

झेप (काव्यसंग्रह – सहभाग)

हम (हिंदी काव्यसंग्रह – सहभाग)

Ready Referencer to Incometax Act and Cases
(English - jointly with Adv. M. K. Gore)

# लेखक श्री. पुनम सिंगवी यांचा संक्षिप्त परिचय



'पुनम सिंगवी' (पुनमचंद उत्तमचंद सिंगवी) हे शिक्षण आणि व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टन्ट. सुमारे बारा वर्षे मुंबई येथील पोदार आणि मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अध्यापन. लघुउद्योग प्रकल्पांच्या निर्मितीत प्रमुख सहभाग. 'स्पन पाईप' या स्पन पाइप्स् मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मासिकाचे संस्थापक-संपादक. मुलुंड जिमखाना आणि हरियाली आदी सेवाभावी संस्थांचे जनक.

मध्यमवर्गीय सुशिक्षित, सुसंस्कृत शेतकरी-उद्योजक कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील फागणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण धुळे व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईसारख्या ठिकाणी. त्यामुळे व्यक्तिमत्त्व सव्यसाची होण्यास मदत.

शालेय जीवनापासूनच भटकंती आणि रचनात्मक सामाजिक कार्याची आवड. भटकंतीच्या आवडीतून पर्यावरणरक्षणाच्या रचनात्मक कार्यात जोडले गेले. ठाणे परिसरात पर्यावरणविषयक जनजागृती निर्माण करण्यात सिंहाचा वाटा.

हरियालीच्या माध्यमातून लक्षावधी वृक्षांची लागवड करण्यात प्रमुख सहभाग. पर्यावरणरक्षण, भटकंती आदी विषयांवर विपुल वृत्तपत्रीय लिखाण. ठाणे गौरव, ठाणे नगररत्न, व्यासरत्न, वसुधा महाबळ पुरस्कार आदी विविध पुरस्कारांचे व सन्मानांचे मानकरी. महाराष्ट्र राज्याच्या वनविभागातर्फे मानद वन्यजीव रक्षक म्हणून सन्मानित. वनविभाग आणि ठाणे महानगरपालिका यांच्या विविध समित्यांवर सेवाभावी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत.

सध्या वास्तव्य ठाणे येथे.

punamsingavi@gmail.com